# प्रेस नोट ०२/०५/२०१९

## स्वतःच्या मुलाचे अपहरण करणाऱ्या फिर्यादी आईस व इतर दोन आरोपीतांना हडपसर पोलीसांकडुन अटक

पुणे शहरातील गंभीर गुन्हयांना प्रतिबंध करुन, गुन्हे उघडकीस आणण्याकरीता मा. सुनिल फुलारी, अप्पर पोलीस आयुक्त सो, पुर्व प्रादेशिक विभाग पुणे व मा. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ ५ पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली व मा. सुनिल देशमुख, सहाय्यक पोलीस आयुक्त सो, हडपसर विभाग पुणे यांचे सुचनानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल तांबे यांचेकडून हडपसर पोलीस स्टेशनच्या हददीत विशेष मोहिम राबविण्यात येत होती.

हडपसर पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. ३६८/२०१९ भादविक ३६३,३४ मधील फिर्यादी संगिता चांगदेव जगताप वय ३८ वर्षे धंदा- गृहिणी रा. शुभ ग्लोरिया सोसायटी , बिल्डींग बी, पहिला मजला फ्लॅट नं.१, शेवाळवाडी पुणे यांचा मुलगा आर्यन वय ४ वर्षे हा दिनांक २८/०४/२०१९ रोजी दुपारी ०१.२० वाजता ते ०१.३० वाजण्याचे सुमारास शुभ ग्लोरिया सोसायटी , शेवाळवाडी पुणे येथे पार्कींगमध्ये खेळत असताना कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणास्तव पांढऱ्या रंगाच्या स्कॉर्पिओ गाडीमधुन फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून अपहरण करुन नेले. म्हणुन फिर्याद दिल्याने गुन्हा दाखल होता.

हडपसर पोलीस स्टेशनचे तपास पथकाचे अधिकारी संजय चव्हाण व कर्मचारी पो. ना. २८०० गायकवाड, पो. शि. ७३१७ मुंढे यांनी दाखल गुन्हयाचा बारकाईने अभ्यास करुन, वरिष्ठांच्या मार्गदर्शनानुसार मिळालेल्या गोपनीय बातमीनुसार आरोपी नामे अभिजित अशोक कड वय ३३ वर्षे रा. कोरेगाव मुळ कडवस्ती ता. हवेली जि. पुणे यास शिताफीने ताब्यात घेवुन सखोल चौकशी केली असता त्यांनी सदरचा अपहरणाचा गुन्हा त्याच्या मैत्रिणी १) संगिता चांगदेव जगताप वय ३८ वर्षे रा. शुभ ग्लोरिया सोसायटी, बिल्डींग बी, पहिला मजला फ्लॅट नं.१, शेवाळवाडी पुणे २) संगिता गणेश बारड वय २९ वर्षे रा. विठठल कृष्णा सोसायटी, फ्लॅट नं. १०६, लोणी टोल नाक्या जवळ, लोणी काळभोर पुणे याचेसह केला असल्याचे कबुली दिल्याने त्यांना दाखल गुन्हयात अटक करण्यात आले आहे.

अटक आरोपी यांचेकडून गुन्हयात वापरलेले एकुण किंमत रुपये ४,५०,०००/- ची एक स्कॉर्पिओ गाडी नं एम एच १२ एच एल ६२५९ हि गुन्हयाचे पुरावेकामी जप्त करण्यात आले आहे.

सदर गुन्हयाची थोडक्यात हकीकत अशी की, फिर्यादी संगिता चांगदेव जगताप हिच्या पहिल्या पती पासुन त्याला दोन अपत्य आहेत. ते फिर्यादी सोबत राहतात. पहिला पती हयात असताना तिचे सुत चांगदेव शंकर जगताप याच्याशी जुळले. त्या दरम्यान फिर्यादीचा पती मयत झाल्यानंतर फिर्यादी हिने चांगदवे शंकर जगताप याच्याबरोबर संसार थाटला. चांगदेव शंकर जगताप याच्या पासुन फिर्यादीस अपहरण झालेला आर्यन हा मुलगा झाला. काही महिन्यापासुन फिर्यादी व पती चांगदेव यांच्यामध्ये वांरवार वाद चालु आहेत. चांगदेव जगताप यांचा सिड फॉर्मच्या व्यवसाय शिर्डी येथे असुन तो तेथेच त्यांच्या आई वडिलांसमवेत राहतो. व तो महिन्यातून केव्हातरी पुणे येथे फिर्यादीकडे एखादा दिवस राहणेस येतो. १० ते १२ दिवसापुर्वी चांगदेव जगताप याने शिर्डी येथे दुसरे लग्न करुन परस्पर तो त्याच्या दुसऱ्या पत्नी सोबत शिर्डी येथे राहु लागला ही बातमी फिर्यादी पत्नीस समजल्यानंतर त्याचा जाब विचारण्यासाठी फिर्यादी ही शिर्डी येथे पतीकडे गेली असता फिर्यादीने पत्ीकडे समझोतासाठी १५ लाख व एका फ्लॅटची मागणी केली. तेंव्हा पती चांगदेव जगताप याने फिर्यादीची मागणी फेटाळून लावली. त्यावेळी त्यांच्यामध्ये जोरदार भांडणे झाली होती. त्यावेळी फिर्यादीच्या पतीने व त्याच्या आई वडिलांनी आर्यनचा ताबा मागितला होता. त्यावेळी फिर्यादीने आर्यनचा ताबा देण्यास नकार दिला होता. चांगदेव जगताप याने फिर्यादी पत्नीस बऱ्याच दिवसापासून आर्थिक मदत देण्याचे

बंद केल्याने फिर्यादी पत्नी अस्वस्थ होती. त्यातून तिने तिची लोणी येथे राहणारी मैत्रिण संगिता गणेश बारड हिस संपर्क साधला व पती चांगदेव जगताप याचेकडून १५ लाख व एक फलॅट मिळविण्याकरीता मुलगा आर्यन याचा अपहरणचा प्लॅन बनवला. फिर्यादींने तिची मैत्रीण संगिता गणेश बारड व हिचा मित्र अभिजित अशोक कड यास हाताशी धरुन संगणमताने आर्यन याचे दिनांक २८/०४/२०१९ रोजी दुपारी ०१.३० वाजण्याचे सुमारास शेवाळवाडी पुणे येथील शुभ ग्लोरिया सोसायटीच्या पार्कींगमधुन अपहरण केले व मुलांचे अपहरण झालेबाबत फिर्यादीने तिचा पती चांगदेव यांना कळविले. दाखल गुन्हयाचा तपास करीत असताना पोलीसांना अपहरण झालेला मुलगा आर्यन याचा स्कॉर्पिओ या गाडीच्या व्दारे अपहरण झाल्याची माहिती पोलीसांना प्राप्त झाली. ती फिर्यादींना देण्यात आली. यामुळे फिर्यादीने घाबरुन जावुन आरोपी अभिजित आणि संगिता बारड यांच्याशी संपर्क साधुन मुलाला तात्काळ सोडण्यास सांगितले. त्यावेळी आरोपीत यांनी मुलगा आर्यन याला मांजरी येथील गोपाळपटटी येथे एका घराच्या जवळ सोडुन त्यावर पाळत ठेवली व मुलगा आर्यन यास त्या घरातील एका इसमाने आर्यनकडे चौकशी करुन त्यास राहत्या सोसायटीत आणले. त्यांनतर फिर्यादीच्या ताब्यात मुलगा मिळाल्याची खात्री झाल्यानंतर आरोपी अभिजित व संगिता बारड हे पसार झाले. दाखल गुन्हयात फिर्यादी ही आरोपी असल्याचे निष्पन्न झाल्याने फिर्यादीस दाखल गुन्हयात अटक करण्यात आले.

सदरची कामगिरी मा. सुनिल फुलारी, अप्पर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग पुणे व मा. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ५ पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली मा. सुनिल देशमुख, सहाय्यक पोलीस आयुक्त, हडपसर विभाग पुणे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल तांबे, पोलीस निरीक्षक हमराज कुंभार यांचे सुचनानुसार सहा.पोलीस निरीक्षक संजय चव्हाण, प्रसाद लोणारे, पो.हवा. ८२३ युसुफ पठाण, पो. हवा. ५५६२ राजेश नवले, पो. ना. २८०० प्रताप गायकवाड, पो. ना. ५८९४ प्रमोद टिळेकर, पो. ना. ६४८९ विनोद शिवले, पो. ना. ६८७० सैदोबा भोजराव, पो. शि. ७३१७ नितीन मुंढे, पो. शि. ८६९२ अकबर शेख, पो. शि. ७५१२ गोविंद चिवळे, पो. शि. ७६८४ शशिकांत नाळे यांनी केली आहे.